अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

नोटीस.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ) अन्वये )

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

दिनांक : १६ -०८-२००७.

श्री. / श्रीमती............................................

सदस्य,

अहमदनगर महानगरपालिका.

यांस

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( अ ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक २४-०८-२००७ रोजी दुपारी १.०० वाजता महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

सोबत : १.विषय पत्रिका व टिप्पणी.
२.दि.२७-४-२००७ चे इतिवृत्त.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

शुक्रवार दिनांक २४-०८-२००७ रोजी दुपारी १.०० वाजता महानगरपालिका सभागृहांत होणां-या मा.सर्वसाधारण सभेपुढील विषय पत्रिका.

--*--

१ मागील दि.२७-४-२००७, रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

२ दुखवटयाचे प्रस्ताव

३ प्रश्नोत्तरे

१. मा.श्री.जोशी अनंत सुर्यकांत,नगरसेवक यांच्या दि.१०-५-२००५ रोजीच्या यादीतील प्रश्नांची उत्तरे.

२. मा.श्री.आगरकर अभय जगन्नाथ,नगरसेवक यांच्या दि.२४-५-२००५ रोजीच्या यादीतील प्रश्नांची उत्तरे.

३. मा.श्री.पवार नामदेव शांताराम,विरोधी पक्ष नेता यांच्या दि.१३-२-२००७ रोजीच्या यादीतील प्रश्नांची उत्तरे.

४ प्रारूप विकास योजना (वाढीव हद्य) अहमदनगर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम सन १९६६ चे कलम ३० अन्वये मुदतवाढ मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

५ अहमदनगर दुसरी सुधारित मंजुर विकास योजने मधील जी.एल.आर.नं.११७ या माध्यमिक शाळेसाठी व क्रीडांगणासाठी आरक्षित ( आरक्षण क्र.१६९ ) असलेल्या जागेवरील आरक्षण वगळुन सदर जागा रहिवास विभागात समाविष्ट करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

६ अहमदनगर महानगरपालिकेने तात्पुरत्या स्वरूपात सहा महिन्याकरीता मानधनावर नियुक्त केलेले चार अभियंते यांच्या सेवा महानगरपालिकेमध्ये कायमस्वरूपी करणे बाबत मा.सर्वश्री विनित नाथ पाऊलबुध्दे , मा.शेख अरिफ शेख रफिउद्यीन ,मा.साठे मनेश दशरथ, मा.गिरवले कैलास रामभाऊ , मा.डागवाले किशोर आसाराम , सदस्य, मा.सौ.काळे गितांजली सुनिल , सदस्या ,अहमदनगर महानगरपालिका यांची दि.१०-७-२००७ ची यादी.

७ एकात्मिक शहर विकास योजना,अहमदनगर योजना सुधारित करणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

८ अहमदनगर महानगरपालिकेच्या विकास आराखडयामधील व महानगरपालिकेच्या विविध विकास कामांकरीता खाजगी कन्सल्टंट नेमणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

९ विकास योजना अहमदनगर (वाढीव क्षेत्र) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम २८ (२) अन्वये गठीत करावयाच्या नियोजन समितीमध्ये तीन मा.स्थायी समिती सदस्यांची नियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

१० मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

मा.महापौर साहेब यांचे मान्यतेने.
दिनांक १६ -०८-२००७.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

कृपया टिप्पणी मागे पहाणे...

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

शुक्रवार दिनांक २४-०८-२००७ रोजी दुपारी १.०० वाजता महानगरपालिका सभागृहांत होणां-या मा.सर्वसाधारण सभेपुढील विषया बाबतची टिप्पणी.

--*--

| अ.नं. | विषय | टिप्पणी |
|---|---|---|
| १ | मागील दि.२७-४-२००७, रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत. | नियमा प्रमाणे आहे. इतिवृत्त कायम करणेस हरकत नाही. |
| २ | दुखवटयाचे प्रस्ताव | टिप्पणी नाही |
| ३ | प्रश्नोत्तरे<br>१. मा.श्री.जोशी अनंत सुर्यकांत,नगरसेवक यांच्या दि.१०-५-२००५ रोजीच्या यादीतील प्रश्नांची उत्तरे.<br>२. मा.श्री.आगरकर अभय जगन्नाथ,नगरसेवक यांच्या दि.२४-५-२००५ रोजीच्या यादीतील प्रश्नांची उत्तरे.<br>३. मा.श्री.पवार नामदेव शांताराम,विरोधी पक्ष नेता यांच्या दि.१३-२-२००७ रोजीच्या यादीतील प्रश्नांची उत्तरे. | १.मा.श्री.जोशी अनंत सुर्यकांत,नगरसेवक<br>२.मा.श्री.आगरकर अभय जगन्नाथ,नगरसेवक<br>३.मा.श्री.पवार नामदेव शांताराम , विरोधी पक्ष नेता. यांच्या प्रश्नांची उत्तरे. |
| ४ | प्रारूप विकास योजना (वाढीव हद्द) अहमदनगर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम सन १९६६ चे कलम ३० अन्वये मुदतवाढ मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. | ऑफिस रिपोर्टानुसार मान्यतेस्तव सादर. |
| ५ | अहमदनगर दुसरी सुधारित मंजुर विकास योजने मधील जी.एल.आर. नं.११७ या माध्यमिक शाळेसाठी व क्रीडांगणासाठी आरक्षित ( आरक्षण क्र.१६९ ) असलेल्या जागेवरील आरक्षण वगळुन सदर जागा रहिवास विभागात समाविष्ट करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. | ऑफिस रिपोर्टानुसार मान्यतेस्तव सादर. |
| ६ | अहमदनगर महानगरपालिकेने तात्पुरत्या स्वरूपात सहा महिन्याकरीता मानधनावर नियुक्त केलेले चार अभियंते यांच्या सेवा महानगरपालिकेमध्ये कायमस्वरूपी करणे बाबत मा.सर्वश्री विनित नाथ पाऊलबुध्दे , मा.शेख अरिफ शेख रफिउद्यीन ,मा.साठे मनेश दशरथ, मा.गिरवले कैलास रामभाऊ , मा.डागवाले किशोर आसाराम , सदस्य, मा.सौ.काळे गितांजली सुनिल , सदस्या ,अहमदनगर महानगरपालिका यांची दि.१०-७-२००७ ची यादी. | टिप्पणी नाही. |
| ७ | एकात्मिक शहर विकास योजना,अहमदनगर योजना सुधारित करणेबाबत ऑफिस रिपोर्ट. | ऑफिस रिपोर्टानुसार मान्यतेस्तव सादर. |
| ८ | अहमदनगर महानगरपालिकेच्या विकास आराखडयामधील व महानगरपालिकेच्या विविध विकास कामांकरीता खाजगी कन्सल्टंट नेमणे बाबत ऑफिस रिपोर्ट. | ऑफिस रिपोर्टानुसार मान्यतेस्तव सादर. |
| ९ | विकास योजना अहमदनगर (वाढीव क्षेत्र) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम २८ (२) अन्वये गठीत करावयाच्या नियोजन समितीमध्ये तीन मा.स्थायी समिति सदस्यांची नियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. | मा.महासभेने निर्णय घेणे योग्य होईल. |
| १० | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. | टिप्पणी नाही |

दिनांक :१६-०८-२००७.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १ दिनांक : २४-०८-२००७.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : मागील दि.२७-४-२००७, रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : मागील दि. दि.२७-४-२००७, रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेसाठी मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविले.

-- * --

चर्चा :

१) मा.श्री.कृ.द.जाधव - मागील सभेचे इतिवृत्त कायम करताना मागील सभेमध्ये झालेल्या ठरावामध्ये सिटी इंजिनिअर म्हणून श्री.एन.बी.मगर यांना दोन वर्षे ठेवण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता. त्यांना संधी देउन शासनाकडे ठराव मंजुरीकरीता पाठवावे असे ठरले असताना सुध्दा श्री.पालवे, सिटी इंजिनिअर यांना हजर करुन घेण्यात आले आहे. मग झालेल्या ठरावाला किंमत आहे कि नाही. यावर मा.महापौर यांनी खुलासा केला की, चर्चेच्या वेळीच श्री.पालवे हजर होण्यासाठी आले असता त्यांना हजर करुन घेण्यात यावे असे ठरले होते.

२) मा.श्री.अभय आगरकर - याबाबत आयुक्त यांचे काय मत आहे. यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, शासनाच्या ऑर्डर असतील त्याप्रमाणे फॉलो करणे आवश्यक आहे. संबंधीत व्यक्ती रुजू होणार असेल त्यांना रुजू करुन घेण्यात यावे असे ठरले होते.

३) मा.श्री.दिपक सुळ, उपमहापौर - श्री.पालवे हे २-३ महिने हजर होत नव्हते. परंतु त्यांना आता हजर करुन घेण्यात आले आहे. तत्पुर्वी श्री.एन.बी.मगर यांनी शहर अभियंता म्हणून चांगले काम केलेले असल्याने दोन वर्षे त्यांना संधी दयावी अशा हेतूने ठराव केलेला होता. शासनाकडे महासभेचा ठराव पाठविला नाही.

४) मा.श्री.कृ.द.जाधव - श्री.पालवे येण्यापूर्वी श्री.मगर सिटी इंजिनिअर म्हणून काम पहात होते. त्याबाबत ठराव केला होता. त्याला काहीच महत्व नाही काय.

५) मा.श्री.अनंत जोशी - ओपनस्पेसबाबत सभेमध्ये ठराव झालेला असताना पुढील वेळी चर्चेसाठी विषय घेण्यात येईल असे सांगितले असताना विषय आलेला नाही. त्याचप्रमाणे ओपनस्पेसला मनपाचे बोर्ड लावणेबाबत मंजूर केलेले असतानाही बोर्ड लावले नाहीत. ओपन स्पेसमध्ये मोठया प्रमाणावर अतिक्रमणे झालेली आहेत. त्याची पहाणी करुन याबाबत पाठपुरावा करता येईल.

६) मा.श्री.शं.ह.घुले - मागील प्रश्नोत्तराच्या तासात काही प्रश्न उपस्थित झालेले होते. त्याबाबतचे प्रोसिडींग वाचून दाखववावे व त्याबाबत मला खुलासा देण्यात येईल असा शब्द दिलेला होता. सभागृहामध्ये जे घडलेल्या घटनेबाबत चर्चा करणे मा.महापौर यांचे काम आहे. पुढील विषयात माहिती घेउन का देण्यात आली नाही. यावर मा.महापौर यांनी खुलासा केला की, माझयाकडे फाईल दिली गेली नव्हती. यावर मा.श्री.घुले यांनी सांगितले की, आपण स्पष्ट कबुली दिल्याबददल आभारी आहे. परंतु एखादया ठिकाणी भुखंड गायब होत असेल त्याचा खुलासा करणे आवश्यक आहे. यावर खुलासा करणेबाबत मा.महापौर यांनी सुचना दिल्या.

७) मा.श्री.दिपक सुळ, उपमहापौर - याबाबत संबंधीत विभागाने लेखी खुलासा केलेला आहे. त्यामुळे आपले समाधान झाले असे सांगितले. तथापि मा.श्री.घुले यांनी सांगितले की सदरचा विषय जनरल बोर्डात घेण्यात यावा असे मी सांगितले होते. यावर मा.महापौर यांनी नगरसचिव यांना विचारले की, सदर बाबतीत सर्व साधारण सभेपुढे विषय का घेतला नाही. यापुढे नोंद घेउन महापौर यांनी दिलेल्या सुचना पाळल्या गेल्या पाहिजेत, असे सुचविले. त्यावर मा.श्री.घुले यांनी त्यांना देण्यात आलेले पत्र वाचून दाखविले व सुचविले की, याबाबत महापालिकेने रिट पिटीशन दाखल करावे. त्यावर श्री.धोंगडे यांनी खुलासा केला. त्यावर उपमहापौर श्री.सुळ यांनी सांगितले की सदरची घटना गंभीर आहे. मनपाने कोर्टात जावे. ते का गेलेले नाहीत. यावर मा.महापौर यांनी सांगितले ही घटना १० वर्षापूर्वीची आहे. शासनाच्या विरोधात अपील करता येईल काय.

८) मा.श्री.बहिरनाथ वाकळे - पूर्वीचा ले-आउट कॅन्सल करता येतो. यावर नगररचनाकार यांनी खुलासा केला की, परवाना रद्द केला आहे. शासनाचे विरोधात रिट पिटीशन करण्याकरिता याबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे. याबाबत मा.महापौर यांनी अपिल करु शकतो काय, करता येत असल्यास रिट पिटीशन करावे असे सांगितले.

९) मा.श्री.अभय आगरकर - शासनाचे विरोधात जाउन रिटपिटीशन करु शकत नाही. याबाबत कायदेशीर मत मागविण्यात यावे व याबाबत पुनश्च चर्चा करावी. यावर मा.महापौर यांनी कायदेशीर मत मागवावे व पुढील मिटींगमध्ये चर्चा करावी असे सांगितले. यावर मा.श्री.घुले यांनी सविस्तर चर्चा करावी या मताशी सहमती दर्शविली.

१०) मा.श्री.अनंत जोशी - समिती स्थापन करावी असे ठरविले होते ते केले आहे काय. केलेले नाही, अशाबाबत मा.महापौर यांनी खुलासा केला. व नंतर समिती स्थापन करु असे सांगितले. यांवर श्री.जोशी यांनी सांगितले, कुठलीही कारवाई होत नाही. बांधकाम परवानगी कशी दिलेली आहे. अतिक्रमणे काढली जात नाहीत. ओढयात अतिक्रमणे करुन बांधकामे चालू आहेत. श्री.इथापे, अतिक्रमण अधिकारी यांनी खुलासा केला की, मंजूर ले-आउट बाबत मोजणी केलेली आहे.

११) मा.श्री.दिपक सुळ, उपमहापौर - अतिक्रमणबाबत डीएसपी यांचेशी चर्चा झालेली आहे. परमनंट लोक घ्यावेत असे सांगितले. यावर मा.श्री.आगरकर यांनी पोलीस बंदोबस्त घेणेबाबत सांगितले.

१२) मा.श्री.भानुदास कोतकर - अतिक्रमण हटविताना ४-५ पोलिसांचे पथक ३ महिन्यासाठी घेण्यात यावे, असे सुचविले.

१३) मा.श्री.अशोक कानडे - विविध प्रश्न - स.नं.२ - ३० लाख रु. भ्रष्टाचाराबाबत चर्चा करणेसाठी उभे राहीले असता मा.महापौर यांनी याबाबत यादी दयावी. मग कार्यवाही करण्यात येईल, असे सांगितले. भळगट बाबत काय कारवाई झाली - मा.महापौर यांनी सांगितले की, मागील इतिवृत्तात रु.१ लाख देणेबाबत सुधारणा करावी.

मा.महापौर - झालेल्या ठरावाबाबत मा.शासनाकडे प्रस्ताव पाठविणेची कारवाई का केली नाही. यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, कायदेशीर बाबी पूर्ण करुन पाठविण्यात येईल.

१४) मा.श्री.अभय आगरकर - रस्त्याचे विषय घेण्यात आलेले होते. परंतु त्या रस्त्याबाबत तफावत आढळत आहे. सदस्य यांनी सुचविलेले रस्ते घेतले काय याचा खुलासा करावा. चर्चेमध्ये आम्ही सुचविलेले रस्ते घेण्यात यावेत व त्याप्रमाणे यादया घेण्यात याव्यात. सर्व भागाचा समतोल विकास होत नाही असे आमचे मत आहे. बोल्हेगांव, नागापूर येथे २ कामे प्रस्तावीत केली होती. ती कामे घेण्यात यावीत. कन्फर्मेशनचा प्रश्न आल्यावर आपण इतिवृत्त कायम करु शकतो. यावर

मा.श्री.घुले यांनी माझा वॉर्ड विकास निधी श्री.आगरकर साहेब यांचे वॉर्डात वापरण्यात यावा. यावर मा.महापौर यांनी खुलासा केला की, आम्ही सगळयांची कामे घेणार आहोत.

१५) मा.श्री.कैलास गिरवले - केडगांव विकासाची कामे महापौर यांनी हाती घेतली आहेत. कारण केडगांवचे महापौर म्हणून केडगांव येथील नागरिकांच्या मोठया अपेक्षा आहेत. त्यामुळे केडगांवचे कोथरुड झाल्याशिवाय राहणार नाही.

१६) मा.श्री.भगवान फुलसौंदर - मागील वर्षी अंदाजपत्रकामध्ये मोठया प्रमाणावर रस्त्याची कामे मंजूर केलेली होती. त्या रस्त्यांचे काम कोठपर्यंत आले आहे याचा खुलासा करावा. यावर श्री.मगर यांनी खुलासा करणेबाबत मा.आयुक्त यांनी सुचना केली. त्याप्रमाणे श्री.मगर यांनी खुलासा केला. त्यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला कि, बरीचशी कामे वॉर्डमध्ये चालु आहेत.

१७) मा.श्रीमती.साहनी - आम्ही दिलेल्या कामाच्या यादया संबंधीत विभागास मिळाल्या नसल्याबाबत तक्रार केली. यावर मा.महापौर यांनी यादया संबंधीत विभागास पाठविल्या जातात असा खुलासा केला. त्यावर श्रीमती.साहनी यांनी संबंधीत इंजिनिअर यांना सुचना देणेबाबत सांगितले. यावर मा.आयुक्त यांनी सुचविले की, प्रत्येक वॉर्डातून छोटया छोटया कामाच्या ब-याच यादया येतात. परंतु मोठी कामे घेणे आवश्यक असते. यावर श्री.जोशी यांनी सांगितले की, यादयांना उत्तरे देणे बंधनकारक नाही काय. त्यावर आयुक्त यांनी खुलासा केला की, उत्तरे देणे बंधनकारक नाही असे सांगितले नाही.

--*--

**ठराव :** मागील दि.२७-४-२००७, रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस मंजुरी देण्यांत येत आहे.तसेच जलतरण तलावामध्ये भळगट कुटूंबियांच्या मुलाचा मृत्यु झाला याबद्यल भळगट परिवारास १ लक्ष रूपये अर्थसहाय्य देण्याबाबत कार्यवाही करण्यांस देखील ही सभा मान्यता देत आहे. नियमानुसार उचित कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक : मा.श्री. कृ.द.जाधव
अनुमोदक : मा.श्री.अशोक कानडे

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : २ दिनांक : २४-०८-२००७.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : दुखवटयाचे प्रस्ताव

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर :

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ३ दिनांक : २४-०८-२००७.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : प्रश्नोत्तरे

१. मा.श्री.जोशी अनंत सुर्यकांत,नगरसेवक यांच्या दि.१०-५-२००५ रोजीच्या यादीतील प्रश्नांची उत्तरे.

२. मा.श्री.आगरकर अभय जगन्नाथ,नगरसेवक यांच्या दि.२४-५-२००५ रोजीच्या यादीतील प्रश्नांची उत्तरे.

३. मा.श्री.पवार नामदेव शांताराम,विरोधी पक्ष नेता यांच्या दि.१३-२-२००७ रोजीच्या यादीतील प्रश्नांची उत्तरे.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : १. मा.श्री.जोशी अनंत सुर्यकांत,नगरसेवक यांच्या दि.१०-५-२००५ रोजीच्या यादीतील प्रश्नांची उत्तरे.

| अ.नं. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १ | अधिकारी आणि पदाधिकारी यांच्या वाहनांची माहिती ? | अधिकारी व पदाधिकारी यांच्या वाहनांची माहिती.<br>१.मा. आयुक्त साहेब, एम.एच.१६ एन ११११<br>२.मा. उपायुक्त साहेब, प्रतिपूर्ती देवून स्वतःचे वाहन वापर.<br>३.मा. उपायुक्त साहेब, प्रतिपूर्ती देवून स्वतःचे वाहन वापर.<br>४.मा. महापौर साहेब, एम.एच.१६ एन १००१.<br>५.मा. उपमहापौर साहेब, एम.एच.१६ एन २११.<br>६.मा. सभापती स्थायी समिती, एम.एच.१६ एम २०१.<br>७.मा. सहाय्यक आयुक्त, एम.एच.१६ ई एन २४२४.<br>८.मा. शहर अभियंता, एम.एच. १६ एन १०१.<br>९.तोफखाना दवाखाना, एम.एच.१६ एन २४.<br>१०.पा.पु.विभाग, एम.एच.१६ एन ४७.<br>११.पा.पु.विभाग, एम.एच.१६ - ७८८८ (रिपे.काम चालू)<br>१२.आरोग्याधिकारी-} मा.स्थायी समिती ठराव.<br>१३.मा. सभागृह नेता} क्र.६ दि १८/९/०६ अन्वये<br>१४.मा. सभापती } मंजूरीने भाडे पध्दतीने वाहने<br>महिला बालकल्याण} लावलेली आहेत.<br>१५.अकौंट व }<br>नगर रचना विभाग-} |
| २ | किती वाहने चालु आहेत त्यावर किती ड्रायव्हर नियुक्त आहेत ? | मोटार व्हेईकल विभागाकडील वरील सर्व वाहने कार्यरत असून एकूण १२ वाहनचालक तसेच २ मदतनीस कार्यरत आहेत. |
| ३ | ड्रायव्हर / चालकांची नियुक्ती नियमाप्रमाणे आहे का ? असल्यास त्यांना जादा कामाचे ओव्हरटाईम पेमेंट देण्यांत येते का ? | याबाबत आपले मागणी प्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेतील कार्यरत असणां-या वाहन चालकांना मा.शासन निर्णय क्रमांक अकाभ / १३०४ / प्र.क्र.१८ / सेवा - ८ मंत्रालय,मुंबई दि.१६ ऑगस्ट २००४ चे परिपत्रकान्वये |

| | | |
| --- | --- | --- |
| ४ | दिले असल्यास कधी पर्यंत दिले आहे ? | अतिकालीन भत्ता जा.क्र.आस्थापना ११०६ दिनांक ७-७-०७ अन्वये लागु करणेंत आलेला आहे. |

२. मा.श्री.आगरकर अभय जगन्नाथ,नगरसेवक यांच्या दि.२४-५-२००५ रोजीच्या यादीतील प्रश्नांची उत्तरे.

| अ.नं. | प्रश्न | उत्तर |
| --- | --- | --- |
| १ | महानगरपालिकेमध्ये सध्या किती वाहने आहेत ? | अहमदनगर महानगरपालिकेमध्ये महानगरपालिकेची एकूण ५६ वाहने आहेत. |
| २ | त्यापैकी किती वाहने कार्यरत अथवा दैनंदिन वापरात आहेत ? | सदर वाहनापैकी २६ वाहने लिलावात टाकलेले असून इतर सर्व वाहने कार्यरत आहेत. |
| ३ | यासर्व वाहनांवर चालक किती आहेत ? | या सर्व वाहनांवर ३८ वाहन चालक व १९ मदतनीस म्हणून काम करत आहे. |
| ४ | हे सर्व चालक सर्व वाहनांकरीता पुरेसे आहेत किंवा कसे ? | |
| ५ | सर्व वाहने ही पुर्ण कार्यक्षमतेने दैनंदिन चालतात का ? | महानगरपालिकेकडील वाहने पूर्ण कार्यक्षमतेने काम देत आहे. जी वाहने जूनी झालेली असून रिपेअरिंग खर्च जास्त आहे. ती वाहने लिलावात टाकलेली आहे. |
| ६ | जर चालत नसतील तर त्याची कोणकोणती कारणे आहेत ? | |
| ७ | आपणांकडे चालक आहेत ते दररोज किती तास सेवा देतात ? | महानगरपलिकेकडे उपलब्ध असलेले वाहन चालक नियमानुसार सेवा देत आहे. तसेच आवश्यक त्या जादा तासाचे कामही करित आहे. |
| ८ | ते देत असलेली सेवा आपणांस पुरेशी आहे किंवा कसे ? | |
| ९ | जे चालक जास्त तास काम करतात त्यांना जास्त मेहनताना दिला जातो किंवा नाही ? देत नसल्यास का देत नाही ? तशी कायद्यामध्ये तरतुद आहे किंवा नाही ? | याबाबत आपले मागणी प्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेतील कार्यरत असणां-या वाहन चालकांना मा.शासन निर्णय क्रमांक अकाभ / १३०४ / प्र.क्र.१८ / सेवा - ८ मंत्रालय,मुंबई दि.१६ ऑगस्ट २००४ चे परिपत्रकान्वये अतिकालीन भत्ता जा.क्र.आस्थापना ११०६ दिनांक ७-७-०७ अन्वये लागु करणेंत आलेला आहे. |

३. मा.श्री.पवार नामदेव शांताराम,विरोधी पक्ष नेता यांच्या दि.१३-२-२००७ रोजीच्या यादीतील प्रश्नांची उत्तरे.

| अ.नं. | प्रश्न | उत्तर | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| १ | अधिकारी आणि पदाधिकारी हयांच्या वाहनांची माहिती ? | अ. नं. | वाहन क्रमांक | पदाधिकारी, अधिकारी | शेरा |
| | | १ | MH-16/N-1111 | मा.आयुक्त साहेब | |
| | | २ | प्रतिपूर्ती देउन / स्वतःचे वाहन वापर | मा.उपायुक्त साहेब (सा) | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ३ | प्रतिपूर्ती देउन / स्वतःचे वाहन वापर | मा.उपायुक्त साहेब (कर) | |
| | | ४ | MH-16/N/1001 | मा.महापौर साहेब | |
| | | ५ | MH-16/N-211 | मा.उपमहापौर साहेब | |
| | | ६ | MH-16/N-201 | मा.सभापती स्थायी समिती | |
| | | ७ | MH-16/E-2424 | मा.सहा.आयुक्त. | |
| | | ८ | MH-16/N-101 | मा.शहर अभियंता | |
| | | ९ | MH-16/N-24 | तोफखाना दवाखाना | |
| | | १० | MH-16/N-47 | पा.पु.विभाग | |
| | | ११ | MH-16/N-7888 | पा.पु.विभाग | [काम चालू ] |
| | | १२ | MH-16/Q-8120 | मा.आरोग्याधिकारी | मा.स्थायी समिती |
| | | १३ | MH-16/Q-8353 | मा.सभापती, महिला बा. | ठराव क्र.६ दि.१८/९/०६ |
| | | १४ | MH-16/Q-8419 | अकौंट व नगररचना वि. | अन्वये मंजूरीने भाडे पध्दतीने वाहने लावलेली आहेत. |
| | | १५ | MH-16/B-9739 | अकौंट व नगररचना वि. | |
| | | १६ | MH-16/Q-8436 | मा.विरोध पक्ष नेता | |
| | | १७ | MH-16/B-9190 | सावेडी वसुली विभाग | |
| | | १८ | MH-16/C-3599 | शहर वसुली विभाग | |
| २ | किती वाहने चालु आहेत त्यावर किती ड्रायव्हर नियुक्त आहेत ? | महानगरपालिकेचे एकुण ५६ वाहने आहेत. त्यापैकी २६ वाहने लिलावात टाकलेले असुन इतर सर्व वाहने कार्यरत आहेत. यासाठी वाहनांवर ३८ वाहनचालक व १९ मदतनीस म्हणुन काम करीत आहे. | | | |
| ३ | ड्रायव्हर / चालकांची नियुक्ती नियमाप्रमाणे आहे का ? असल्यास त्यांना जादा कामाचे ओव्हर टाईम पेमेंट देण्यात येते का ? | वाहन चालकांची नियुक्ती आस्थापना विभागामार्फत करण्यात येते. वाहन चालकांना ओव्हर टाईमचे पेमेंट तरतुद नसल्याने अदा करण्यात येत नाही. | | | |
| ४ | दिले असल्यास कधी पर्यंत दिले आहे ? नसल्यास कधी पासुन द्यावयाचे आहे ? | मोटार व्हेईकल विभागाकडे याबाबत कुठल्याही स्वरूपाचे आदेश नसल्याने अद्याप पर्यंत ओव्हरटाईम देण्यात आलेला नाही. | | | |

--*--

चर्चा :

१) मा.श्री.अनंत जोशी - दोन वर्षानंतर आमच्या यादीची उत्तरे पाठविली याबद्दल आभारी आहे. आम्ही यादया दिल्यामुळे वाहनांवरील चालकांना अतिकालीक भत्ता मिळू लागला हे योग्यच

झाले. परंतु त्याच वेळी मला उत्तर दिले असते तर बरे झाले असते. येथून पुढे लवकरात लवकर उत्तरे दयावे असे सांगितले.

२) मा.श्री.अभय आगरकर - प्रश्नांच्या संदर्भामधील काही प्रश्नांची उत्तरे संदिग्ध स्वरुपाची आहेत. लिलावामध्ये किती वर्षापासून वाहने काढलेली आहेत याचा खुलासा करावा व लिलावातील वाहन क्र.२४२४ वापरात आहे व त्यावर खर्च केला जात आहे. जुनी वाहने लिलावात काढणे आवश्यक आहे. त्या वाहनांवर खर्च करु नये. यावर खर्च कसा काय केला जातो. यावर नियंत्रण दिसून येत नाही.

प्रत्येक विभागाच्या कामाबाबतचे ॲसेसमेंट करणे आवश्यक आहे व त्या दृष्टीकोनातून बदल करणे आवश्यक आहे. डिपार्टमेंटवाईज ॲसेसमेंट केले पाहिजे. ज्या खात्यात कमी कर्मचारी आहेत व ज्या खात्यात जास्त कर्मचारी आहेत ते पुरेसे आहेत का, त्यांच्या काय अडचणी आहेत, त्यांच्या व्यथा समजून घेतल्या जात नाहीत. याकरिता एक अभ्यास समिती नेमली पाहिजे.

मा.आयुक्त यांनी खुलासा केला कि, कृती आराखडा तयार आहे.

कमिटी स्थापन करण्यास काय अडचण आहे.

आरसीएच योजनेअंतर्गत एक्झामिनेशन टेबल कामाचे आहेत काय याबाबत निर्णय घेण्याची गरज आहे. यावर मा.महापौर यांनी खुलासा केला की, आपण एकत्रीत बसून सविस्तर चर्चा करु असे सांगितले. यानंतर सभागृहामध्ये सर्व सदस्य उभे राहून सभागृहात गोंधळ झाला व विरोधी सदस्यांनी १० मिनीटे सभात्याग केला.

--*--

**ठराव :** संबंधित मा.सदस्यांना त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची लेखी उत्तरे देण्यांत आलेली असुन सदरील उत्तरे सभेत वाचुन दाखविण्यांत आली आहे.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ४ दिनांक : २४-०८-२००७.

---

प्रस्तावाचा विषय : प्रारूप विकास योजना (वाढीव हद्य) अहमदनगर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम सन १९६६ चे कलम ३० अन्वये मुदतवाढ मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : मा.शासनाने सन १९९९ मध्ये अहमदनगर महानगरपालिकेची हद्यवाढ केली असून सदर हद्यवाढ क्षेत्राची प्रारूप विकास योजना दि.२७-७-०६ रोजीच्या शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम सन १९६६ चे कलम ३० मधील तरतुदीनुसार प्रारूप विकास योजना प्रसिध्द झाल्यापासुन १२ महिन्याच्या कालावधीत सदर योजना मंजुरीसाठी शासनाकडे सादर करणे आवश्यक असते. त्यानुसार वाढीव हद्यीची प्रारूप विकास योजना दि.२६-७-२००७ पर्यंत शासनाकडे मंजुरीसाठी सादर करणे आवश्यक आहे.

तथापि प्रारूप विकास योजना प्रसिध्द झाल्यानंतर विहित मुदतीत प्राप्त झालेल्या हरकत / सुचना धारकांना सुनावणी देण्यासाठी नियोजन समिती गठीत करण्याची कार्यवाही अद्याप चालु आहे. नियोजन समितीच्या एकुण सात सदस्यांपैकी चार सदस्यांची नियुक्ती दि.३-४-०७ रोजी शासनाने केलेली असुन उर्वरित तीन स्थायी समिती सदस्यांची नेमणुक करण्याचा प्रस्ताव महासभेकडे सादर करण्यात आलेला आहे. मात्र नियोजन समिती गठीत झाल्यानंतर हरकत / सुचना धारकांना सुनावणी देवुन त्यावर निर्णय घेवुन प्रारूप विकास योजना महासभेच्या मंजुरीने विहीत मुदतीत म्हणजेच दि.२६-७-०७ पर्यंत शासनाकडे सादर करणे अशक्य आहे.

त्यामुळे प्रारूप विकास योजना मंजुरीसाठी शासनाकडे सादर करण्यास उक्त अधिनियमाच्या कलम ३० मधील तरतुदीनुसार दि.२७-७-०७ पासुन पुढे १२ महिन्याच्या कालावधीसाठी म्हणजेच दि.२७-७-२००७ ते २६-७-२००८ या कालावधीसाठी शासनाकडुन मुदतवाढ घेणे उचित होईल.

तरी प्रारूप विकास योजना ( वा.ह.) अहमदनगर मा.शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यांस महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम सन १९६६ चे कलम ३० अन्वये दि.२७-७-२००७ ते २६-७-२००८ या कालावधीचा मुदतवाढ प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास मान्यता मिळणेसाठी सदरचा विषय महासभेकडे सादर करणेबाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ " प्रस्तावित मा.महासभेकडे पाठविणेस हरकत वाटत नाही.मान्यतेस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, महासभेपुढे प्रस्ताव ठेवणेत यावा.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त साहेब व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--*--

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट मंजुर.महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३० अन्वये दिनांक २७-०७-२००७ ते २६-०७-२००८ या एक वर्षाच्या कालावधीचा मुदतवाढ प्रस्ताव मा.शासनाकडे सादर करणेस मान्यता देण्यात येत असुन पुढील योग्य ती नियमानुसार कार्यवाही करण्यांत यावी.

ठराव बहुमताने मंजुर.

सुचक : मा.श्री. अशोक कानडे
अनुमोदक : मा.श्री.कृ.द.जाधव

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ५ दिनांक : २४-०८-२००७.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : अहमदनगर दुसरी सुधारित मंजुर विकास योजने मधील जी.एल.आर.सर्व्हे नं.११७ या माध्यमिक शाळेसाठी व क्रीडांगणासाठी आरक्षित ( आरक्षण क्र.१६९ ) असलेल्या जागेवरील आरक्षण वगळुन सदर जागा रहिवास विभागात समाविष्ट करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : अहमदनगर शहराची दुसरी सुधारीत विकास योजना शासनाने निर्णय क्र.टीपीएस/१६९९/१६१२/सी.आर.२७ (ब)/०३/यु.डी.-९ दि.४ जुलै २००५ अन्वये मंजुर केली असुन ती दि.२३/०८/२००५ पासुन अंमलात आलेली आहे.

सदर मंजुर विकास योजना आराखडयात जी.एल.आर.नं.११७ व ११८ ही जागा आरक्षण क्रं.१६९ अन्वये माध्यमिक शाळा व क्रीडांगण यासाठी आरक्षित (क्षेत्र १.१३ हेक्टर ) ठेवण्यात आली होती. त्यापैकी जी.एल.आर.नं.११७ ही जागा अर्जदार रयत शिक्षण संस्थेच्या मालकीची आहे. महाराष्ट्रात सदर संस्थेचे मोठे शैक्षणिक कार्य आहे. व त्यांच्या प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालय, आश्रमशाळा, वस्तीगृह, आय.टी.आय. इत्यादी अनुषंगिक एकुण ६६९ शाखा सध्या कार्यरत आहेत.

सदर संस्थेने स्वतःच्या शैक्षणिक नियोजनाच्या दृष्टीने त्यांनी त्यांच्या मालकीच्या जी.एल. आर. नं.११७ वरील आरक्षण क्र. १६९ उठविणे बाबत मा.शासनाने केलेल्या विनंती नुसार शासनाने विकास योजना आराखडयातील जी.एल.आर. नं.११७ वरील आरक्षण रद्द करुन सदर भाग रहिवास विभागात समाविष्ट केलेला आहे. ( E.P.-१४)

तथापि मंजुर विकास योजना आराखडयात जी.एल.आर.नं.११७ च्या उत्तरेकडे दर्शविण्यात आलेला जी.एल.आर.नं.११८ हा प्रत्यक्षात जी.एल.आर.नं.११७ सी व ११७ बी आहे. व अतिशय थोडा केवळ दर्ग्यापुरता भाग (क्षेत्र - १५२.०० चौ.मी.) हा जी एल.आर.नं.११८ आहे. आराखड्या मध्ये जी.एल.आर.नं.११७ ची व ११८ ची हद्द दर्शविण्यात झालेल्या तांत्रिक चुकीमुळे E.P.१४ व्दारे प्रत्यक्षातील जी.एल.आर.नं.११७ च्या फक्त काही भागावरील आरक्षण उठविण्यात आलेले असुन, संस्थेच्या मालकीच्या बहुतांश भाग आरक्षण क्र.१६९ अन्वये आरक्षीत राहीला आहे.

संस्थेचे शैक्षणिक कार्य विचारात घेवुन शासनानेही संस्थेच्या जागेवरील आरक्षण उठविण्याच्या दृष्टीकोनातुन E.P.१४ व्दारे सदर भाग रहिवास विभागात समाविष्ट केल्याचे दिसुन येते. त्यामुळे महानगरपालिकेनेही संस्थेच्या उर्वरीत जागेवरील आरक्षण उठवून सदर जागा रहिवास विभागात समाविष्ट करण्याची कार्यवाही करणेस हरकत नाही.

तरी मंजुर विकास योजना आराखड्यातील जी.एल.आर.नं.११८ (प्रत्यक्षात ११७ व ११८ वरील) वरील आरक्षण क्रं.१६९ या माध्यमिक शाळा व क्रीडांगणासाठी असलेल्या आरक्षण ऐवजी सदर जागा रहिवास विभागात समाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये विकास योजनेत फेरबदल करण्याची कार्यवाही करणे बाबतचा प्रस्ताव मंजुरीसाठी मा.महासभेस सादर करणे योग्य होईल. आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त(कर) यांचा अभिप्राय की, नगररचना यांचे प्रस्तावातील "अ" नुसार मान्यतेसाठी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, यांचा अभिप्राय की, शासनाचे यापूर्वीचे आदेश व तसेच पूर्ण नस्ती सादर करावी.

यावर नगररचनाकार यांचेकडुन सादर की, मा.शासनाने मंजूर केलेल्या वि.यो.च्या अधिसूचनेची प्रत व नस्तिका सोबत सादर करीत आहे.

यावर मा.महापौर साहेब, यांचा अभिप्राय की, मा.आयुक्त यांचे मताशी सहमत प्रस्ताव मा.सर्व साधारण सभेपुढे ठेवणेत यावा.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (कर) व मा.आयुक्त साहेब , नगररचनाकार, मा.महापौर साहेब, यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयासाठी मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

----o----

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट मंजुर.जी.एल.आर.सर्व्हे नं.११७ या माध्यमिक शाळा व क्रीडांगणासाठी आरक्षित असलेल्या जागेवरील आरक्षण वगळुन ( आरक्षण क्र. १६९ ) त्या ऐवजी सदर जागा रहिवास विभागात समाविष्ट करणेंस मंजुरी देण्यांत येत आहे. नियमाप्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

ठराव बहुमताने मंजुर.

सुचक : मा.श्री. नामदेव पवार

अनुमोदक : मा.श्री.बहिरनाथ वाकळे

सही /-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ६ दिनांक : २४-०८-२००७.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : अहमदनगर महानगरपालिकेने तात्पुरत्या स्वरूपात सहा महिन्याकरीता मानधनावर नियुक्त केलेले चार अभियंते यांच्या सेवा महानगरपालिकेमध्ये कायमस्वरूपी करणे बाबत मा.सर्वश्री विनित नाथ पाऊलबुध्दे , मा.शेख अरिफ शेख रफिउद्यीन ,मा.साठे मनेश दशरथ, मा.गिरवले कैलास रामभाऊ , मा.डागवाले किशोर आसाराम , सदस्य, मा.सौ.काळे गितांजली सुनिल , सदस्या ,अहमदनगर महानगरपालिका यांची दि.१०-७-२००७ ची यादी.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : वरील सन्माननीय सदस्यांच्या यादीचा साधारण मसुदा खालील प्रमाणे.

" विनंती यादी देणेत येते की, दिनांक १-७-१९९९ रोजी १२ गावांचा समावेश तत्कालीन नगरपरिषदेमध्ये झाला. तद्नंतर नगरपरिषदेचे महानगरपालिकेमध्ये दि. ३०-६-२००३ रोजी रूपांतर झाले. सध्या बांधकाम विभागामध्ये पाच अभियंते व एक शहर अभियंता असे एकुण सहा अभियंते आहेत. शहराचे क्षेत्र पाहता सध्याचे अभियंतेंची संख्या फारच कमी आहे. त्यामुळे शहरातील विविध विकास कामे तातडीने व वेळेत होत नाहीत.

सध्या महानगरपालिकेने चार अभियंता यांची तात्पुरती नेमणुक सहा महिन्याकरीता मानधनावर केलेली आहे. त्यांची मुदत पुढील महिन्यात संपत आहे. मागील पाच महिन्याचा त्यांच्या कामाची पध्दत पाहता त्यांनी अत्यंत उत्तमरित्या कामे केलेली आहेत. त्यामुळे महानगरपालिकेतील बांधकाम विभागातील कामांना गती आलेली आहे व कामे चांगली होत आहेत. परंतु सदर अभियंत्यांच्या तात्पुरत्या स्वरूपाच्या नेमणुका असल्याने त्यांचेवर योग्य ती जबाबदारी टाकता येत नाही.

तरी कंत्राटी अभियंता यांची सेवा महानगरपालिकेमध्ये कायमस्वरूपी करणेबाबत येत्या सर्वसाधारण सभेमध्ये विषयपत्रिकेवर घेणेबाबत विनंती आहे.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, यादी मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे.

उपरोक्त सन्माननीय सदस्यांच्या याद्या मा.सर्वसाधारण सभेपुढे सादर.

--*--

**ठराव :** मा.सर्वसाधारण सभेत झालेल्या साधक - बाधक चर्चेनुसार ठरविण्यांत येते की, सदर चार अभियंते यांना तुर्त सहा महिने करीता वाढीव मुदत देण्यांस ही सभा मंजुरी देत आहे. तसेच महानगरपालिकेत भविष्यात अभियंत्यांची पदे भरतांना , विहित प्रक्रिया पुर्ण करतांना हंगामी नेमणुक करणेत आलेले अभियंता यांचे देखील महानगरपालिकेतील कामाच्या , माहितीचा प्राधान्याने विचार करण्यात यावा. प्रथमतः सदर चार अभियंत्यांना प्राधान्यक्रम देण्यांत यावे. नियमानुसार कार्यवाही करावी.

ठराव बहुमताने मंजुर.

सुचक : मा.श्री. विनीत पाअुलबुध्दे

अनुमोदक : मा.श्री.किशोर डागवाले

सही /-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ७ दिनांक : २४-०८-२००७.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय -- एकात्मिक शहर विकास योजना,अहमदनगर योजना सुधारित करणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : अहमदनगर शहराची एकात्मिक शहर विकास योजना केंद्र शासनाने सन २००२ मध्ये मंजुर केलेली असुन त्यानुसार योजनेचा मंजूर परिव्यय रु.८२५.२८ लक्ष एवढा आहे. व त्या अनुषंगाने या योजने अंतर्गतची काही कामे प्रगती पथावर आहेत.

अहमदनगर शहराची वर्गवारी विचारात घेता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार या शहरासाठी किमान रु.५५०.०० लक्षची योजना तयार करणे आवश्यक आहे. व रक्कम रु.५५०.०० लक्षच्यावर होणारा अतिरिक्त खर्च महानगरपालिकेने स्वतःच्या निधीतुन उभा करणे अभिप्रेत आहे. ही बाब मा.उपसंचालक, नगररचना, नाशिक विभाग, नाशिक, हे दि.१७/४/२००७ रोजी अहमदनगर दौ-यावर असतांना मा.आयुक्त साहेब व मा.महापौर साहेब यांचे समवेत झालेल्या बैठकी मध्ये चर्चेतुन स्पष्ट झाले तसेच या योजनेच्या समाधान कारक प्रगतीवर केंद्र शासनाच्या पुढील योजनांची मंजुरी अवलंबून असल्याचेही मा.उपसंचालक यांनी स्पष्ट केले. ही योजना पुर्ण करून या योजनेचे पुर्णत्व प्रमाणपत्र (Completion Certificate) सादर करणे केंद्र शासनाच्या सुचनेत त्यांनी दिले त्यासाठी आवश्यक तर या योजनेतील अनावश्यक घटक वगळून ही योजना सुधारित करण्याची सुचनाही त्यांनी दिल्या त्या दृष्टीकोनातुन या योजनेचा फेर आढावा घेण्यात आला त्यात खालील बाबी स्पष्ट होतात.

सन २००२ साली मंजुर झालेल्या अहमदनगर शहराच्या सुधारित एकात्मिक शहर विकास योजनेतील घटकांची भौतिक प्रगती दर्शविणारा तक्ता सोबत जोडला आहे.

उपरोक्त नमुद तक्त्याचे अवलोकन केले असता खालील घटक एकात्मिक शहर विकास योजने मधुन वगळणे योग्य होईल.

१) न.र.यो.क्र.४, अं.भू.क्र.२४९ सि.स.नं.२७७ रंगभवन येथे कल्याण मंडप उभारणे :- सदरच्या प्रकल्पाच्या स्थानात बदल करुन नाट्यगृह प्रकल्पासाठी सावेडी येथील न.र.यो.क्र.४ अं.भू.क्र.१२९ ही जागा प्रस्तावित केलेली असुन हा प्रकल्प जिल्हा पातळीवर नाट्यगृह बांधणे या योजने अंतर्गत प्रस्तावित केला आहे. सबब हा प्रस्ताव एकात्मिक शहर विकास योजने मधुन वगळणे योग्य होईल.

२) न.र.यो.क्र.१, अं.भू.क्र.१२८ पै. गंजबाजार येथे भाजी मंडई व दुकान केंद्र बांधणे :-हा प्रकल्प बांधा, वापरा व हस्तांतर करा किंवा हमी योजनेतील महानगरपालिकेने स्वतःच्या निधीतून बांधणे योग्य होईल. सध्या हा प्रकल्प विद्यमान भाजी विक्रेतेच्या व दुकानदारांच्या पुर्नवसनाच्या प्रश्नामुळे प्रलंबित आहे. सबब हा प्रस्ताव एकात्मिक शहर विकास योजने मधुन वगळणे योग्य होईल.

३) न.र.यो.क्र.४, अं.भू.क्र.१२९ पै. प्रोफेसर कॉलनी येथील दुकान केंद्र :- या प्रकल्पाच्या बांधकामाबाबत सल्लागार स्थापत्य अभियंत्यांनी प्रतीकुल शेरा मारलेला आहे. विद्यमान दुकानांचे बांधकाम हे निकृष्ट दर्जाचे असल्याने त्यावर इमारत बांधता येणार नाही. ही बाब स्पष्ट झाल्याने हा प्रकल्प उपरोक्त योजनेतुन वगळणे योग्य होईल.

४) सर्जेपुरा, बेलदारगल्ली सि.स.नं.१०४० मधील दुकान संकुल :- सदर प्रकल्पासाठी तीन वेळा निविदा काढुनही योग्य दराच्या निविदा प्राप्त झालेल्या नाहीत. हे काम करण्यास होणारा विलंब लक्षात घेता हा प्रकल्प एकात्मिक शहर विकास योजने मधुन वगळणे योग्य होईल.

हे प्रकल्प वगळल्यानंतर या योजनेची एकुण किंमत ४३०.४६ लक्ष एवढी येते. अहमदनगर महानगरपालिकेसाठी किमान ५५०.०० लाखाची योजना तयार करणे आवश्यक असल्याने पुर्वीच्या मंजुर घटक कामांच्या खालील प्रमाणे किंमती वाढविणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | घटकाचे नांव | पुर्वीचा मंजुर नियतव्यय रुपये लाखात | प्रस्तावित सुधारित नियतव्यय रुपये लाखात | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | पाईप लाईन रस्त्यावरील पथदिवे बसविणे | १८.२० | २६.२७ | १ कि.मी. लांबीचा रस्ता मनपा हद्दीमध्ये आल्यामुळे |
| २ | नरयो क्र.४, अं.भू. क्र. १२९ पै. सावित्रीबाई फुले भाजी मंडई बांधणे. | ४५.७७ | ७०.७७ | दुसरा मजल्याचे बांधकाम प्रस्तावात सामील केल्यामुळे |
| ३ | ३०.०० मी.रुंदीचा रिंग रोड रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण | ७१.८२ | १४९.२९ | रस्ता सुशोभिकरणा मुळे अंदाजपत्रक वाढले आहे. |

वरील प्रमाणे सुधारणा केल्यानंतर या योजनेची एकुण किंमत रु.५५१.०० लक्ष इतकी येते त्याप्रमाणे योजना सुधारित करुन एकात्मिक शहर विकास योजना होणे आवश्यक आहे. यासाठी मा.महासभेची मंजुरी आवश्यक आहे.

सबब उपरोक्त प्रस्ताव मा.महासभेस सादर करण्यासाठी व पुढील आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त कर यांचा अभिप्राय की, एकात्मिक शहर विकास योजना सुधारित करणे बाबतचा नगररचना विभागाचा प्रस्ताव मंजूरीसाठी मा.महासभेपुढे ठेवणे योग्य राहील. मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त सो, यांचा अभिप्राय की, प्रस्तावाबाबत (Revised) मा.उपसंचालक यांचेबरोबर चर्चा करावी.

यावर नगररचनाकार यांचा अभिप्राय फेरसादर की, मा.उपसंचालक नगररचना नाशिक विभाग यांचे समवेत सविस्तर चर्चा केली. सदर एकात्मिक विकास योजना सुधारित करणे आवश्यक असुन भविष्यातील U.I.D.S.S.M.T या योजनेच्या मंजुरी साठी जुन्या I.D.S.M.T. सुधारित करण्याची आवश्यकता आहे. सबब सदर विषय महासभेस सादर करणे योग्य होईल. आदेशार्थ सादर.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त,मा.आयुक्त सो, मा.महापौर सो, नगररचनाकार यांच्या अभिप्रायासह व फेर रिपोर्टसह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--*--

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट मंजुर नियमानुसार कार्यवाही करावी.

ठराव बहुमताने मंजुर.

सुचक : मा.श्री.किशोर डागवाले
अनुमोदक : मा.श्री.बहिरनाथ वाकळे

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ८ दिनांक : २४-०८-२००७.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय -- अहमदनगर महानगरपालिकेच्या विकास आराखडयामधील व महानगरपालिकेच्या विविध विकास कामांकरीता खाजगी कन्सल्टंट नेमणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : अहमदनगर महानगरपालिका हद्यीतील विविध विकास कामाबाबत व मा.केंद्र शासन व राज्य शासनाकडे विविध प्रस्ताव सादर करावे लागतात.सदरचे प्रस्ताव पाठवितांना जागेचे संपुर्ण सर्व्हेक्षण करणे,सविस्तर नकाशे तयार करणे,अंदाजपत्रक तयार करणे इत्यादी बाबी करीता महानगरपालिकेकडे पुरेसे तांत्रिक कर्मचारी वर्ग नसल्यामुळे मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यास विलंब होतो.

१.तसेच प्रत्यक्ष काम करतेवेळी पुरेसे तांत्रिक कर्मचारी वर्ग नसल्याने कामाच्या गुणवत्तेवरही परिणाम होतो.सदरबाबत महानगरपालिकेचे विकास कामाकरीता सर्व्हेक्षण करणे,वाहतुक सर्व्हेक्षणासह सविस्तर नकाशे तयार करणे,अंदाजपत्रक तयार करणे,कामावर देखरेख करणे,गुण नियंत्रण ठेवणे व महानगरपालिकेस वेळोवेळी तांत्रिक सहाय्य देणे इत्यादी कामाचा अनुभव असलेल्या तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करणे आवश्यक वाटते.

सदर काम खाजगी सल्लागार नेमण्याकरीता खालील अटी व शर्तीस अधीन राहून निविदा मागविणे आवश्यक वाटते.

अटी व शर्ती

अ ) पहिल्या लिफाफ्यात कंपनीची माहिती खालील नमूद केल्याचे दाखले व इतर माहिती सादर करावी.फक्त खालील शर्तीची पुर्तता करणा-या सल्लागार कंपनी अर्ज करण्यास पात्र राहतील.

१. तांत्रिक सल्लागारास शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग,मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण ,महानगरपालिका,नगरपालिका,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे वरीलप्रमाणे काम करीत असल्याचा तसेच कामे पुर्ण केल्याचा दाखला अर्जासोबत जोडावा.

२. मागील ३ वर्षात कंपनीने कमीत कमी ४० कोटीची कामे अनुक्रमांक १ मध्ये नमूद केल्याठिकाणी केल्याचा किंवा करीत असल्याचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

३. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे काम केलेले अनुभवी अभियंते असलेल्या सल्लागार कंपनीस प्राधान्य देण्यांत येईल.

४. मुंबई महानगर विकास प्राधिकरण किंवा तत्सम पतपुरवठा करणा-या संस्थाकडून कर्ज उपलब्ध करण्याचा अनुभव असलेल्या सल्लागार कंपनीने तशी माहिती दयावी.

५. सल्लागार कंपनीने पुर्ण केलेल्या व हातात असलेल्या प्रकल्पाची माहिती जोडावी तसेच जे अभियंते प्रत्यक्ष काम करणार यांची माहिती व कंपनीत काम करीत असलेले इंजिनिअर,आर्किटेक,सर्वेअर यांची माहिती जोडणे आवश्यक आहे.

६. कंपनीच्या वार्षीक उलाढालीची माहिती जोडावी.

७. सर्व माहिती व दाखले सल्लागारांनी (अ ) लिफाफयात सादर करावे.

अ ) लिफाफा प्रथम उघडण्यात येईल व त्यामध्ये वरील अटींची पुर्तता करणा-या सल्लागार कंपनीचाच ब लिफाफा उघडण्यात येईल.

ब ) लिफाफयात सल्लागार कंपनीने कन्सल्टन्सी फी चा दर सादर करावयाचा आहे.वरील दर खालील कामे करण्याकरीता असावा.

१. प्लेनटेबल सर्व्हे व लेव्हलींग क्रॉस सेक्शन सॉईल टेस्टींग ट्रॅफीक सर्व्हे करणे.
२. वरील सर्व्हे वर व टेस्टींगवर आधारीत पेव्हमेंट डिझाईन करणे व सविस्तर अंदाजपत्रके तयार करणे.
३. अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता मिळविणे.
४. प्रोजेक्ट पुर्ण करण्यासाठी लागणारा कर्ज पुरवठा मिळविण्यासाठी संबंधीत पतपुरवठा संस्थेकडे प्रोजेक्ट रिपोर्ट सादर करणे व त्याचा पाठपुरावा करणे.
५. निविदा पेपर्स व टेंडर नोटीस तयार करणे.
६. ठेकेदाराची नियुक्ती झाल्यानंतर कामाची देखरेख / गुणनियंत्रण करणे व मापे तयार करुन महानगरपालिकेच्या इंजिनिअर्सना बिले तयार करण्यासाठी सहकार्य करणे.
७. काम पुर्ण झाल्यावर पुर्णत्वाचा व गुणवत्तेचा दाखला देणे.

टिप : अ ) सल्लागार कंपनीची नेमणूक करतांना त्यांचा महानगरपालिका विकास कामाचा अभियंत्याचा अनुभव व आर्थिक क्षमता यांना प्राधान्य देण्यात येईल.

ब ) सर्व सामान्य प्रचलित पध्दतीने कामाची फी ठरविण्यात येईल.कमी किंवा जादा दराची निविदा मान्य / अमान्य करण्याचा अधिकार खालील सही करणा-यांनी राखून ठेवला आहे.

तरी उपरोक्त निविदा कामास व येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेस आदेशार्थ सविनय सादर.

यावर उपशहर अभियंता यांचा अभिप्राय की,शाखा अभियंता यांचे प्रस्तावाप्रमाणे मान्यतेस्तव तथा निर्णयास्तव सादर.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,निविदेमध्ये कामांची नावे न टाकता निविदा प्रसिध्दी करावी असे वाटते.अवलोकनार्थ व आदेशास्तव

यावर अंतर्गत लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की,प्रस्तावाप्रमाणे मान्यतेस्तव.

यावर मा.उपायुक्त (सा ) प्रस्तावीत मा.महासभेत प्रशासकीय मान्यतेस्तव ठेवणेकरीता मंजुरीस्तव सादर.

यावर मा.महापौर यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवणे

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट उपशहर अभियंता,शहर अभियंता,अंतर्गत लेखा परिक्षक , उपायुक्त (सा) ,मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--*--

चर्चा :

१० मिनीटे सभात्यागानंतर विरोधी सदस्य पुन्हा सभागृहामध्ये आले. त्यावेळेस त्यांनी पुढील विषयावर चर्चा करणेची मागणी केली. तथापी सदर वेळी मा.श्री.शं.ह.घुले यांनी सांगितले की, विषय क्र.४ ते ७ यापूर्वीच मंजूर केलेले आहेत. त्यामुळे विषय क्र.८ वर चर्चा करावी असे सांगितले. त्यामुळे सभागृहात पुन्हा गोंधळ झाला.

यानंतर मा.श्री.भानुदास कोतकर, नगरसेवक यांनी श्री.बनकर यांना विषय क्र.८ वाचणे बाबत सुचना केली. त्यानुसार विषय क्र.८ वाचून दाखविण्यात आला. मा.श्री.घुले यांनी या विषयाला मंजुरी देणेबाबत सुचविले.

मा.आयुक्त यांनी सांगितले की, शहराचा ८४ किलोमिटरचा एरिया असल्यामुळे नवीन विकासाची कामे करणे आवश्यक आहे. यावर मा.श्री.भानुदास कोतकर यांनी नवीन समाविष्ट १२ गावांच्या विकासाचा बॅकलॉग राहीलेला आहे, त्यामध्ये लाईट, रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज इ. करणे आवश्यक आहे, याबाबतचे नियोजन काय आहे असे विचारले. याबाबत सर्व्हे करणेचे आदेश दयावेत.

यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, याबाबत महापालिकेने लागणा-या स्टाफ कर्मचा-यांचा प्रस्ताव पूर्ण केलेला आहे. पुढील सर्व साधारण सभेपुढे हा प्रस्ताव येणार आहे. तसेच १२ गावांचा विकास आराखडा तयार करुन त्याकरिता येणारा एकूण खर्च व लागणा-या फंडाचा वापर योग्यरितीने करण्यासाठी कन्सलटंट नेमणे आवश्यक आहे व याबाबत पुनश्च सेप्रेट मिटींगपुढे विकास आराखडा ठेवण्यात येणार आहे.

१) मा.श्री.भगवान फुलसौंदर - प्रस्ताव चांगला आहे. त्यापुर्वी रस्ते चांगले करण्याचा प्रस्ताव दिला होता. याबाबत मनपाचे काय काय प्रस्ताव झाले आहेत, याची माहिती दयावी. सावेडी हद्द, १२ गांवे इ. याकरिता मनपाने नवीन ४ इंजिनिअर नेमलेले आहेत. आणखी इंजिनिअर नेमण्याची आवश्यकता आहे.

२) मा.श्री.आसाराम कावरे - इंजिनिअर टेंपररी नेमले जावू नयेत. यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, नवीन इंजिनिअर नेमण्याची कार्यवाही चालू आहे.

३) मा.श्री.दीप चव्हाण - विषय क्र.८ वर चर्चा चालु आहे. आतापर्यंत कोणकोणत्या कन्सलटींग एजन्सी नेमलेल्या आहेत व कोणकोणती कामे दिली आहेत. शासनाने विकास आराखडयाबाबत कोणी अधिकारी नेमले आहेत काय? श्री.निकम यांची टाउन प्लॅनर म्हणून नेमणूक झाली आहे असे वाटते. कोणकोणत्या कामासाठी कन्सलटंट नेमणार आहेत ते नमूद करावे.

४) मा.श्री.शंकरराव घुले - अशा प्रकारची एजन्सी पाणीपुरवठयाकरीता नेमली होती. ती दोन लाख रुपये घेउन गेली.

५) मा.श्री.अनंत जोशी - कालावधीचा उल्लेख केलेला नाही. विकास आराखडयाच्या संदर्भात कामे देण्यात आली आहेत, त्याचा खुलासा करावा. नागरिकांची येणारी पत्रे, यादी यांचा त्यात समावेश होईल काय. यावर मा.उपमहापौर यांनी खुलासा केला की, करारात उल्लेख होणार आहे. यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, कन्सलटंट पॅनलवर नेमणार आहेत. ५ ते १० लाख पासून रु.१ कोटीपर्यंतची कामे यासाठी पॅनलवर कन्सलटंट नेमण्यात येईल.

६) मा.श्री.कैलास गिरवले - मोठमोठया रस्त्यांचा अगोदर विचार करावा. पाईपलाईन रोड, बालिकाश्रम रोड, गुलमोहोर रोड इ.

७) मा.श्री.सुनिल त्रिपाठी - आमच्या भागातील रस्त्यांवर आतापर्यंत रु.१ ही खर्च झालेला नाही. कार्यवाही काहीच होत नाही. केदारवस्ती येथील पाणीपुरवठा दलितवस्ती येथील कामाबाबत कार्यवाही झाली पाहिजे. दलितवस्तीतील घरे आजही पाण्यात आहेत. त्यांच्या घराच्या भिंती पडणार आहेत. या भागाकडे गांभिर्याने पाहिले जात नाही. यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, या भागाचे एस्टीमेट तयार आहे. हायवे असल्यामुळे परमिशन मिळालेले नाही. यावर श्री.त्रिपाठी यांनी सांगितले की, याबाबत काहीच हालचाल केलेली नाही. दलित वस्तीकरिता शासन अनुदान देत आहे. परंतु मनपा याबाबत काहीच करीत नाही.

यानंतर मा.श्री.नामदेव पवार, मा.श्री.भानुदास कोतकर, मा.श्रीमती.वर्षा सय्यद यांनी चर्चेत भाग घेतला. मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, ज्या विभागातील घरे पडलेली आहेत किंवा पावसाच्या पाण्यामुळे हानी पोहोचली आहे अशा ठिकाणच्या संबंधीत इंजिनिअर यांना मदत करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत.

८) मा.श्री.अभय आगरकर - पुर्वानुभवानुसार एजन्सी नियुक्त कराव्यात व स्थानिक लोकांना त्यात सामावून घ्यावे.

--*--

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट मंजुर. खर्च मंजुर. अहमदनगर महानगरपालिके मार्फत राबविण्यात येणार असलेल्या विविध विकास कामांकरीता खाजगी कन्स्ल्टंट नेमणे बाबत नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यास ही सभा मान्यता देत असुन, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता सदर प्रकरणी तातडीने अंमलबजावणीची कार्यवाही नियमानुसार करणेस ही महासभा मान्यता देत आहे.

ठराव बहुमताने मंजुर.

सुचक : मा.श्री.भानुदास एकनाथ कोतकर
अनुमोदक : मा.श्री.नामदेव शांताराम पवार

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ९ दिनांक : २४-०८-२००७.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय -- विकास योजना अहमदनगर (वाढीव क्षेत्र) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम २८ (२) अन्वये गठीत करावयाच्या नियोजन समितीमध्ये तीन मा.स्थायी समिति सदस्यांची नियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : अहमदनगर शहराची वाढीव क्षेत्राची विकास योजना मा.महासभेच्या ठराव क्र. ७ दिनांक १७/५/२००६ अन्वये प्रसिदध करणेस मंजुरी मिळालेली आहे. त्याुअनुषंगाने म.प्रा.व.न.र अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये ही वाढीव क्षेत्राची विकास योजना शासन राजपत्रात २७ जुलै २००६ रोजी प्रसिदध करण्यांत आलेली आहे. तसेच या प्रसिदधीकरणाची अधिसुचना दोन दैनिक वर्तमानपत्रात दिनांक १८/७/२००६ रोजी प्रसिदध करण्यांत आली आहे.

उपरोक्त अधिसुचनेच्या प्रसिदधी करणानंतर या विकास योजनेबाबत नागरीकांच्या हरकती व सुचना प्राप्त होत आहेत या हरकती व सुचना दाखल करुन घेण्याची विहित मुदत ही सदर अधिसुचना शासन राजपत्रात प्रसिदध झाल्यापासून दोन महिन्यापर्यंत असते. या विकास योजनेच्या प्रसिदधीकरणाची अधिसुचना शासन राजपत्रात २७/७/२००६ रोजी प्रसिदध झालेली असल्याने सदर हरकती सुचना घ्यावयाची मुदत २६/९/२००६ रोजी संपत आहे.

या विहित मुदतीत प्राप्त झालेल्या हरकती व सुचनांवर विचार करण्यासाठी सबंधीत नागरीकांचे म्हणणे प्रत्यक्ष ऐकुन त्या अनुषंगाने उपरोक्त विकास योजनेवर निर्णय होण्यांचे काम म.प्रा.व.न.र अधिनियमाच्या कलम २८(२) अन्वये गठीत केलेल्या नियोजन समितीने करावयाचे असते ही नियोजन समिती आलेल्या हरकती सुचनांचा विचार करुन आपल्या शिफारशी मा.महासभेस सादर करीत असतात. हरकती / सुचनांची विहीत मुदत २६/९/२००६ रोजी संपत असलयाने आता शक्य तितक्या लवकर या नियोजन समिती ची स्थापना होणे आवश्यक आहे.

म.प्रा.व.न.र अधिनियमाच्या कलम २८(२) अन्वये या नियोजन समितीत जास्तीत जास्त ७ सदस्य असतात त्यापैकी तीन (३) सदस्य हे स्थायी समिती च्या सदस्यापैकी असणे आवश्यक आहे. उर्वरित चार मा राज्यशासनाकडून नियुक्त केले जातात.

सबब मा नियोजन समितीवर तीन (३) स्थायी समिती सदस्यांची नियुक्ती करणेसाठी प्रस्ताव मा महासभेस सादर करणे आवश्यक आहे.

सबब या प्रस्तावाद्वारे मा.महासभेस विनंती की तीन स्थायी समिती सदस्यांची नियुक्ती उपरोक्त नियोजन समितीवर शक्य तितक्या लवकर करण्यांत यावी. म.प्रा.व.न.र अधिनियमाच्या विविध कलमान्वये विकास योजना सादर करण्यासाठी मुदती विहीत केलेल्या आहेत. त्यामुळे ही विकास योजना शासनास सादर करण्यासाठी या नियोजन समितीचे शक्य तितक्या लवकर गठण करुन नियोजन समितीची पुढील कार्यवाही सुरु होणे आवश्यक आहे. आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, प्रस्ताव निर्णयासाठी मा.महासभेपुढे ठेवणे योग्य.

यावर मा.आयुक्त साो यांचा अभिप्राय की, प्रस्तावित समिती गठित करणेसाठीचा शासन निर्णय दाखवा / नियमातील तरतूदीसह फेरसादर करा.

यावर नगर रचनाकार यांचा फेरसादर रिपोर्ट की, उपरोक्त नियोजन समिती बाबत शासनाच्या स्वतंत्र शासन निर्णय झालेला नाही. तथापी म.प्रा.व.न.र अधिनियम १९६६ मधील कलम २८(२) मध्ये या समितीची स्पष्ट तरतुद नमुद केली आहे. या कलम २८(२) मध्येच या समितीत तीन स्थायी समिती सदस्य व चार शासन नियुक्त सदस्य नियुक्त करणे बंधनकारक केलेले आहे.

सोबत - सदर कलमाची छायांकीत प्रत सादर करीत आहे.

यावर मा उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, अहवालानुसार प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यासाठी शिफारस आहे.

यावर मा.आयुक्त साो यांचा अभिप्राय की, प्रस्तावित नियोजन समिती गठित करणेसाठी नियामानुसार ३ सदस्य मा.स्थायी समितीचे सदस्यामधून निवडणेस हरकत नाही.

यावर नगर रचनाकार यांचा अभिप्राय की, उपरोक्त विषयांकित नियोजन समिती स्थापन करण्यासाठी नगर रचना विभागातुन यापुर्वी महासभेस प्रस्ताव सादर केला होता. ( पुर्वीच्या प्रस्तावाची प्रत सुलभ संदर्भासाठी सादर करीत आहे.) तथापि या प्रस्तावाच्या वेळेस या समिती मधील शासन नियुक्त सदस्यांची नेमणुक झालेली नव्हती. त्यामुळे मा.महापौर साहेब यांनी शासकीय सदस्यांच्या नेमणुकीनंतर हा विषय महासभेस सादर करण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्यानंतर शासनाने शासन निर्णय क्र.टीपीएस - १६०६ / ३४५१ / प्र.क्र.४९ / ०७ / नवि - ९ , मंत्रालय / मुंबई ३२ दि.३ एप्रिल २००७ अन्वये चार शासकीय सदस्यांची नेमणुक केली आहे. आता ही नियोजन समिती कार्यरत होण्यासाठी पुर्वी नमुद केल्याप्रमाणे या समितीवर तीन स्थायी समिती सदस्यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. हे सदस्य निवडीचे अधिकार नियोजन प्राधिकरण या नात्याने मा.महासभेस असल्याने सदरचा प्रस्ताव मा.महासभेस सादर करणे आवश्यक आहे.

नियोजन समितीचे काम कालबध्द मुदतीत पुर्ण करावयाचे असल्याने या समितीवर तीन सन्माननीय स्थायी समिती सदस्यांची नियुक्ती करण्याचा निर्णय मा.महासभेने शक्य तितक्या लवकर घेण्याची विनंती प्रशासनामार्फत मा.महासभेस करणे योग्य होईल.

आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा.)यांचा अभिप्राय की, अ प्रस्तावित मान्यतेस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, सर्वसाधारण सभेत ठेवावे.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त ( कर) , मा.उपायुक्त (सा.), मा.आयुक्त साहेब व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह तसेच नगर रचनाकार यांचे फेरसादर रिपोर्टासहपुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--*--

**चर्चा**

१) मा.श्री.कृ.द.जाधव - नियोजन समितीमध्ये मा.स्थायी समितीचे ३ सदस्यांची नियुक्ती करणेबाबतचे अधिकार मा.महापौर यांना देण्यात यावेत. त्यावर मा.श्री.कावरे यांनी त्यात सर्व पक्षाचे लोक घ्यावेत अशी सुचना केली.

२) मा.श्री.सुभाष लोंढे, सभापती, स्थायी समिती - गुप्त मतदान पध्दतीने निवडावेत. यावर मा.उपमहापौर श्री.सुळ यांनी महापौर ठरवतील असे सांगितले.

३) मा.श्री.अभय आगरकर - मतदान करता येईल.

४) मा.श्री.कृ.द.जाधव - स्पष्ट बहुमताने निर्णय झालेला आहे. महापौर यांना अधिकार दिले आहेत.

५) मा.श्री.भगवान फुलसौंदर - स्थायी समितीला अधिकार दयावेत.

यावर मा.श्री.श.ह.घुले बोलण्यासाठी उभे राहीले असता सभागृहामध्ये गोंधळ झाला.

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट व साधक बाधक झालेल्या चर्चेनुसार ठरविण्यात येते की, विकास योजना,अहमदनगर (वाढीव क्षेत्र) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाच्या कलम २८ (२) अन्वये गठीत करावयाच्या नियोजन समितीमध्ये तीन मा.स्थायी समिती सदस्यांची नियुक्ती करणेचे अधिकार मा.महापौर,अहमदनगर महानगरपालिका यांना देण्यांत येत आहे.

ठराव बहुमताने मंजुर.

सुचक : मा.श्री.कृ.द.जाधव.
अनुमोदक : मा.श्री.आसाराम कावरे.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १० दिनांक : २४-०८-२००७.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय -- मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

-- ** --

प्रस्तावाचा मजकुर : खालील मान्यवर सदस्य यांचे रजेचे अर्ज.

१. मा.श्री.चोपडा संजय फुलचंद - दिनांक २४-८-००७.

ठराव : नोंद घेण्यांत येत आहे.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक -१** **दिनांक २४-०८-२००७.**

.....................................................................................................................

**प्रस्तावाचा विषय --** मागील दि.२७-४-२००७, रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

**ठराव :** मागील दि.२७-४-२००७, रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस मंजुरी देण्यांत येत आहे.तसेच जलतरण तलावामध्ये भळगट कुटूंबियांच्या मुलाचा मृत्यु झाला याबद्यल भळगट परिवारास १ लक्ष रूपये अर्थसहाय्य देण्याबाबत कार्यवाही करण्यांस देखील ही सभा मान्यता देत आहे. नियमानुसार उचित कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक : मा.श्री. कृ.द.जाधव
अनुमोदक : मा.श्री.अशोक कानडे

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

**मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक -३** **दिनांक २४-०८-२००७.**

.....................................................................................................................

**प्रस्तावाचा विषय --** प्रश्नोत्तरे

१. मा.श्री.जोशी अनंत सुर्यकांत,नगरसेवक यांच्या दि.१०-५-२००५ रोजीच्या यादीतील प्रश्नांची उत्तरे.

२. मा.श्री.आगरकर अभय जगन्नाथ,नगरसेवक यांच्या दि.२४-५-२००५ रोजीच्या यादीतील प्रश्नांची उत्तरे.

३. मा.श्री.पवार नामदेव शांताराम,विरोधी पक्ष नेता यांच्या दि.१३-२-२००७ रोजीच्या यादीतील प्रश्नांची उत्तरे.

**ठराव :** संबंधित मा.सदस्यांना त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची लेखी उत्तरे देण्यांत आलेली असुन सदरील उत्तरे सभेत वाचुन दाखविण्यांत आली आहे.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

**मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक -४** **दिनांक २४-०८-२००७.**

.................................................................................................................

**प्रस्तावाचा विषय --** प्रारूप विकास योजना (वाढीव हद्द) अहमदनगर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम सन १९६६ चे कलम ३० अन्वये मुदतवाढ मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट मंजुर.महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३० अन्वये दिनांक २७-०७-२००७ ते २६-०७-२००८ या एक वर्षाच्या कालावधीचा मुदतवाढ प्रस्ताव मा.शासनाकडे सादर करणेस मान्यता देण्यात येत असुन पुढील योग्य ती नियमानुसार कार्यवाही करण्यांत यावी.

ठराव बहुमताने मंजुर.

सुचक : मा.श्री. अशोक कानडे
अनुमोदक : मा.श्री.कृ.द.जाधव

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक -५** **दिनांक २४-०८-२००७.**

..........................................................................................................

**प्रस्तावाचा विषय --** अहमदनगर दुसरी सुधारित मंजुर विकास योजने मधील जी.एल.आर.सर्व्हे नं.११७ या माध्यमिक शाळेसाठी व क्रीडांगणासाठी आरक्षित ( आरक्षण क्र.१६९ ) असलेल्या जागेवरील आरक्षण वगळुन सदर जागा रहिवास विभागात समाविष्ट करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट मंजुर.जी.एल.आर.सर्व्हे नं.११७ या माध्यमिक शाळा व क्रीडांगणासाठी आरक्षित असलेल्या जागेवरील आरक्षण वगळुन ( आरक्षण क्र. १६९ ) त्या ऐवजी सदर जागा रहिवास विभागात समाविष्ट करणेंस मंजुरी देण्यांत येत आहे. नियमाप्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

ठराव बहुमताने मंजुर.

सुचक : मा.श्री. नामदेव पवार
अनुमोदक : मा.श्री.बहिरनाथ वाकळे

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक -६** **दिनांक २४-०८-२००७.**

..............................................................................................................

**प्रस्तावाचा विषय --** अहमदनगर महानगरपालिकेने तात्पुरत्या स्वरूपात सहा महिन्याकरीता मानधनावर नियुक्त केलेले चार अभियंते यांच्या सेवा महानगरपालिकेमध्ये कायमस्वरूपी करणे बाबत मा.सर्वश्री विनित नाथ पाऊलबुध्दे , मा.शेख अरिफ शेख रफिउद्यीन ,मा.साठे मनेश दशरथ, मा.गिरवले कैलास रामभाऊ , मा.डागवाले किशोर आसाराम , सदस्य, मा.सौ.काळे गितांजली सुनिल , सदस्या ,अहमदनगर महानगरपालिका यांची दि.१०-७-२००७ ची यादी.

**ठराव :** मा.सर्वसाधारण सभेत झालेल्या साधक - बाधक चर्चेनुसार ठरविण्यांत येते की, सदर चार अभियंते यांना तुर्त सहा महिने करीता वाढीव मुदत देण्यांस ही सभा मंजुरी देत आहे. तसेच महानगरपालिकेत भविष्यात अभियंत्यांची पदे भरतांना , विहित प्रक्रिया पुर्ण करतांना हंगामी नेमणुक करणेत आलेले अभियंता यांचे देखील महानगरपालिकेतील कामाच्या , माहितीचा प्राधान्याने विचार करण्यात यावा. प्रथमतः सदर चार अभियंत्यांना प्राधान्यक्रम देण्यांत यावे. नियमानुसार कार्यवाही करावी.

ठराव बहुमताने मंजुर.

सुचक : मा.श्री. विनीत पाऊलबुध्दे
अनुमोदक : मा.श्री.किशोर डागवाले

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक -७** **दिनांक २४-०८-२००७.**

..............................................................................................................

**प्रस्तावाचा विषय --** एकात्मिक शहर विकास योजना,अहमदनगर योजना सुधारित करणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट मंजुर नियमानुसार कार्यवाही करावी.

ठराव बहुमताने मंजुर.

सुचक : मा.श्री.किशोर डागवाले
अनुमोदक : मा.श्री.बहिरनाथ वाकळे

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक -८** **दिनांक २४-०८-२००७.**

..................................................................................................................

**प्रस्तावाचा विषय --** अहमदनगर महानगरपालिकेच्या विकास आराखडयामधील व महानगरपालिकेच्या विविध विकास कामांकरीता खाजगी कन्सल्टंट नेमणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट मंजुर. खर्च मंजुर. अहमदनगर महानगरपालिके मार्फत राबविण्यात येणार असलेल्या विविध विकास कामांकरीता खाजगी कन्स्ल्टंट नेमणे बाबत नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यास ही सभा मान्यता देत असुन, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता सदर प्रकरणी तातडीने अंमलबजावणीची कार्यवाही नियमानुसार करणेस ही महासभा मान्यता देत आहे.

ठराव बहुमताने मंजुर.

सुचक : मा.श्री.
अनुमोदक : मा.श्री.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

**मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक -९** **दिनांक २४-०८-२००७.**

..........................................................................................................................

**प्रस्तावाचा विषय --** विकास योजना अहमदनगर (वाढीव क्षेत्र) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम २८ (२) अन्वये गठीत करावयाच्या नियोजन समितीमध्ये तीन मा.स्थायी समिति सदस्यांची नियुक्ती करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**चर्चा -**

१) मा.श्री.कृ.द.जाधव - नियोजन समितीमध्ये मा.स्थायी समितीचे ३ सदस्यांची नियुक्ती करणेबाबतचे अधिकार मा.महापौर यांना देण्यात यावेत. त्यावर मा.श्री.कावरे यांनी त्यात सर्व पक्षाचे लोक घ्यावेत अशी सुचना केली.

२) मा.श्री.सुभाष लोंढे, सभापती, स्थायी समिती - गुप्त मतदान पध्दतीने निवडावेत. यावर मा.उपमहापौर श्री.सुळ यांनी महापौर ठरवतील असे सांगितले.

३) मा.श्री.अभय आगरकर - मतदान करता येईल.

४) मा.श्री.कृ.द.जाधव - स्पष्ट बहुमताने निर्णय झालेला आहे. महापौर यांना अधिकार दिले आहेत.

५) मा.श्री.भगवान फुलसौंदर - स्थायी समितीला अधिकार दयावेत.

यावर मा.श्री.श.ह.घुले बोलण्यासाठी उभे राहीले असता सभागृहामध्ये गोंधळ झाला.

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट व साधक बाधक झालेल्या चर्चेनुसार ठरविण्यात येते की, विकास योजना,अहमदनगर (वाढीव क्षेत्र) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाच्या कलम २८ (२) अन्वये गठीत करावयाच्या नियोजन समितीमध्ये तीन मा.स्थायी समिती सदस्यांची नियुक्ती करणेचे अधिकार मा.महापौर,अहमदनगर महानगरपालिका यांना देण्यांत येत आहे.

ठराव बहुमताने मंजुर.

सुचक : मा.श्री.कृ.द.जाधव.

अनुमोदक : मा.श्री.आसाराम कावरे.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

## सर्व साधारण सभा दि.२४-८-०७

विषय क्र.१ - मागील सभेचे इतिवृत्त कायम करणे.

१) मा.श्री.कृ.द.जाधव - मागील सभेचे इतिवृत्त कायम करताना मागील सभेमध्ये झालेल्या ठरावामध्ये सिटी इंजिनिअर म्हणून श्री.एन.बी.मगर यांना दोन वर्षे ठेवण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता. त्यांना संधी देउन शासनाकडे ठराव मंजुरीकरीता पाठवावे असे ठरले असताना सुध्दा श्री.पालवे, सिटी इंजिनिअर यांना हजर करुन घेण्यात आले आहे. मग झालेल्या ठरावाला किंमत आहे कि नाही. यावर मा.महापौर यांनी खुलासा केला की, चर्चेच्या वेळीच श्री.पालवे हजर होण्यासाठी आले असता त्यांना हजर करुन घेण्यात यावे असे ठरले होते.

२) मा.श्री.अभय आगरकर - याबाबत आयुक्त यांचे काय मत आहे. यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, शासनाच्या ऑर्डर असतील त्याप्रमाणे फॉलो करणे आवश्यक आहे. संबंधीत व्यक्ती रुजू होणार असेल त्यांना रुजू करुन घेण्यात यावे असे ठरले होते.

३) मा.श्री.दिपक सुळ, उपमहापौर - श्री.पालवे हे २-३ महिने हजर होत नव्हते. परंतु त्यांना आता हजर करुन घेण्यात आले आहे. तत्पुर्वी श्री.एन.बी.मगर यांनी शहर अभियंता म्हणून चांगले काम केलेले असल्याने दोन वर्षे त्यांना संधी दयावी अशा हेतूने ठराव केलेला होता. शासनाकडे महासभेचा ठराव पाठविला नाही.

४) मा.श्री.कृ.द.जाधव - श्री.पालवे येण्यापूर्वी श्री.मगर सिटी इंजिनिअर म्हणून काम पहात होते. त्याबाबत ठराव केला होता. त्याला काहीच महत्व नाही काय.

५) मा.श्री.अनंत जोशी - ओपनस्पेसबाबत सभेमध्ये ठराव झालेला असताना पुढील वेळी चर्चेसाठी विषय घेण्यात येईल असे सांगितले असताना विषय आलेला नाही. त्याचप्रमाणे ओपनस्पेसला मनपाचे बोर्ड लावणेबाबत मंजूर केलेले असतानाही बोर्ड लावले नाहीत. ओपन स्पेसमध्ये मोठया प्रमाणावर अतिक्रमणे झालेली आहेत. त्याची पहाणी करुन याबाबत पाठपुरावा करता येईल.

६) मा.श्री.शं.ह.घुले - मागील प्रश्नोत्तराच्या तासात काही प्रश्न उपस्थित झालेले होते. त्याबाबतचे प्रोसिडींग वाचून दाखवावे व त्याबाबत मला खुलासा देण्यात येईल असा शब्द दिलेला होता. सभागृहामध्ये जे घडलेल्या घटनेबाबत चर्चा करणे मा.महापौर यांचे काम आहे. पुढील विषयात माहिती घेउन का देण्यात आली नाही. यावर मा.महापौर यांनी खुलासा केला की, माझ्याकडे फाईल दिली गेली नव्हती. यावर मा.श्री.घुले यांनी सांगितले की, आपण स्पष्ट कबुली दिल्याबददल आभारी आहे. परंतु एखादया ठिकाणी भुखंड गायब होत असेल त्याचा खुलासा करणे आवश्यक आहे. यावर खुलासा करणेबाबत मा.महापौर यांनी सुचना दिल्या.

७) मा.श्री.दिपक सुळ, उपमहापौर - याबाबत संबंधीत विभागाने लेखी खुलासा केलेला आहे. त्यामुळे आपले समाधान झाले असे सांगितले. तथापि मा.श्री.घुले यांनी सांगितले की सदरचा विषय जनरल बोर्डात घेण्यात यावा असे मी सांगितले होते. यावर मा.महापौर यांनी नगरसचिव यांना विचारले की, सदर बाबतीत सर्व साधारण सभेपुढे विषय का घेतला नाही. यापुढे नोंद घेउन महापौर यांनी दिलेल्या सुचना पाळल्या गेल्या पाहिजेत, असे सुचविले. त्यावर मा.श्री.घुले यांनी त्यांना देण्यात आलेले पत्र वाचून दाखविले व सुचविले की, याबाबत महापालिकेने रिट पिटीशन दाखल करावे. त्यावर श्री.धोंगडे यांनी खुलासा केला. त्यावर उपमहापौर श्री.सुळ यांनी सांगितले की सदरची घटना गंभीर आहे. मनपाने कोर्टात जावे. ते का गेलेले नाहीत. यावर मा.महापौर यांनी सांगितले ही घटना १० वर्षापूर्वीची आहे. शासनाच्या विरोधात अपील करता येईल काय.

८) मा.श्री.बहिरनाथ वाकळे - पूर्वीचा ले-आउट कॅन्सल करता येतो. यावर नगररचनाकार यानी खुलासा केला की, परवाना रद्द केला आहे. शासनाचे विरोधात रिट पिटीशन करण्याकरिता याबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे. याबाबत मा.महापौर यांनी अपिल करु शकतो काय, करता येत असल्यास रिट पिटीशन करावे असे सांगितले.

९) मा.श्री.अभय आगरकर - शासनाचे विरोधात जाउन रिटपिटीशन करु शकत नाही. याबाबत कायदेशीर मत मागविण्यात यावे व याबाबत पुनश्च चर्चा करावी. यावर मा.महापौर यांनी कायदेशीर मत

मागवावे व पुढील मिटींगमध्ये चर्चा करावी असे सांगितले. यावर मा.श्री.घुले यांनी सविस्तर चर्चा करावी या मताशी सहमती दर्शविली.

१०) मा.श्री.अनंत जोशी - समिती स्थापन करावी असे ठरविले होते ते केले आहे काय. केलेले नाही, अशाबाबत मा.महापौर यांनी खुलासा केला. व नंतर समिती स्थापन करु असे सांगितले. यांवर श्री.जोशी यांनी सांगितले, कुठलीही कारवाई होत नाही. बांधकाम परवानगी कशी दिलेली आहे. अतिक्रमणे काढली जात नाहीत. ओढयात अतिक्रमणे करुन बांधकामे चालू आहेत. श्री.इथापे, अतिक्रमण अधिकारी यांनी खुलासा केला की, मंजूर ले-आउट बाबत मोजणी केलेली आहे.

११) मा.श्री.दिपक सुळ, उपमहापौर - अतिक्रमणबाबत डीएसपी यांचेशी चर्चा झालेली आहे. परमनंट लोक घ्यावेत असे सांगितले. यावर मा.श्री.आगरकर यांनी पोलीस बंदोबस्त घेणेबाबत सांगितले.

१२) मा.श्री.भानुदास कोतकर - अतिक्रमण हटविताना ४-५ पोलिसांचे पथक ३ महिन्यासाठी घेण्यात यावे, असे सुचविले.

१३) मा.श्री.अशोक कानडे - विविध प्रश्न - स.नं.२ - ३० लाख रु. भ्रष्टाचाराबाबत चर्चा करणेसाठी उभे राहीले असता मा.महापौर यांनी याबाबत यादी दयावी. मग कार्यवाही करण्यात येईल, असे सांगितले. भळगट बाबत काय कारवाई झाली - मा.महापौर यांनी सांगितले की, मागील इतिवृत्तात रु.१ लाख देणेबाबत सुधारणा करावी.

मा.महापौर - झालेल्या ठरावाबाबत मा.शासनाकडे प्रस्ताव पाठविणेची कारवाई का केली नाही. यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, कायदेशीर बाबी पूर्ण करुन पाठविण्यात येईल.

१४) मा.श्री.अभय आगरकर - रस्त्याचे विषय घेण्यात आलेले होते. परंतु त्या रस्त्याबाबत तफावत आढळत आहे. सदस्य यांनी सुचविलेले रस्ते घेतले काय याचा खुलासा करावा. चर्चेमध्ये आम्ही सुचविलेले रस्ते घेण्यात यावेत व त्याप्रमाणे यादया घेण्यात याव्यात. सर्व भागाचा समतोल विकास होत नाही असे आमचे मत आहे. बोल्हेगांव, नागापूर येथे २ कामे प्रस्तावीत केली होती. ती कामे घेण्यात यावीत. कन्फर्मेशनचा प्रश्न आल्यावर आपण इतिवृत्त कायम करु शकतो. यावर मा.श्री.घुले यांनी माझा वॉर्ड विकास निधी श्री.आगरकर साहेब यांचे वॉर्डात वापरण्यात यावा. यावर मा.महापौर यांनी खुलासा केला की, आम्ही सगळयांची कामे घेणार आहोत.

१५) मा.श्री.कैलास गिरवले - केडगांव विकासाची कामे महापौर यांनी हाती घेतली आहेत. कारण केडगांवचे महापौर म्हणून केडगांव येथील नागरिकांच्या मोठया अपेक्षा आहेत. त्यामुळे केडगांवचे कोथरुड झाल्याशिवाय राहणार नाही.

१६) मा.श्री.भगवान फुलसौंदर - मागील वर्षी अंदाजपत्रकामध्ये मोठया प्रमाणावर रस्त्याची कामे मंजूर केलेली होती. त्या रस्त्यांचे काम कोठपर्यंत आले आहे याचा खुलासा करावा. यावर श्री.मगर यांनी खुलासा करणेबाबत मा.आयुक्त यांनी सुचना केली. त्याप्रमाणे श्री.मगर यांनी खुलासा केला. त्यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला कि, बरीचशी कामे वॉर्डमध्ये चालु आहेत.

१७) मा.श्रीमती.साहनी - आम्ही दिलेल्या कामाच्या यादया संबंधीत विभागास मिळाल्या नसल्याबाबत तक्रार केली. यावर मा.महापौर यांनी यादया संबंधीत विभागास पाठविल्या जातात असा खुलासा केला. त्यावर श्रीमती.साहनी यांनी संबंधीत इंजिनिअर यांना सुचना देणेबाबत सांगितले. यावर मा.आयुक्त यांनी सुचविले की, प्रत्येक वॉर्डातून छोटया छोटया कामाच्या ब-याच यादया येतात. परंतु मोठी कामे घेणे आवश्यक असते. यावर श्री.जोशी यांनी सांगितले की, यादयांना उत्तरे देणे बंधनकारक नाही काय. त्यावर आयुक्त यांनी खुलासा केला की, उत्तरे देणे बंधनकारक नाही असे सांगितले नाही.

विषय क्र.३ - प्रश्नोत्तरे.

१) मा.श्री.अनंत जोशी - दोन वर्षानंतर आमच्या यादीची उत्तरे पाठविली याबद्दल आभारी आहे. आम्ही यादया दिल्यामुळे वाहनांवरील चालकांना अतिकालीक भत्ता मिळू लागला हे योग्यच झाले. परंतु त्याच वेळी मला उत्तर दिले असते तर बरे झाले असते. येथून पुढे लवकरात लवकर उत्तरे दयावे असे सांगितले.

२) मा.श्री.अभय आगरकर - प्रश्नांच्या संदर्भामधील काही प्रश्नांची उत्तरे संदिग्ध स्वरुपाची आहेत. लिलावामध्ये किती वर्षापासून वाहने काढलेली आहेत याचा खुलासा करावा व लिलावातील वाहन क्र.२४२४ वापरात आहे व त्यावर खर्च केला जात आहे. जुनी वाहने लिलावात काढणे आवश्यक आहे. त्या वाहनांवर खर्च करु नये. यावर खर्च कसा काय केला जातो. यावर नियंत्रण दिसून येत नाही.

प्रत्येक विभागाच्या कामाबाबतचे ॲसेसमेंट करणे आवश्यक आहे व त्या दृष्टीकोनातून बदल करणे आवश्यक आहे. डिपार्टमेंटवाईज ॲसेसमेंट केले पाहिजे. ज्या खात्यात कमी कर्मचारी आहेत व ज्या खात्यात जास्त कर्मचारी आहेत ते पुरेसे आहेत का, त्यांच्या काय अडचणी आहेत, त्यांच्या व्यथा समजून घेतल्या जात नाहीत. याकरिता एक अभ्यास समिती नेमली पाहिजे.

मा.आयुक्त यांनी खुलासा केला कि, कृती आराखडा तयार आहे.

कमिटी स्थापन करण्यास काय अडचण आहे.

आरसीएच योजनेअंतर्गत एक्झामिनेशन टेबल कामाचे आहेत काय याबाबत निर्णय घेण्याची गरज आहे. यावर मा.महापौर यांनी खुलासा केला की, आपण एकत्रीत बसून सविस्तर चर्चा करु असे सांगितले. यानंतर सभागृहामध्ये सर्व सदस्य उभे राहून सभागृहात गोंधळ झाला व विरोधी सदस्यांनी १० मिनीटे सभात्याग केला.

विषय क्र.८ - मनपा विकास आराखडयाकरिता कन्सलटंट नेमणे.

१० मिनीटे सभात्यागानंतर विरोधी सदस्य पुन्हा सभागृहामध्ये आले. त्यावेळेस त्यांनी पुढील विषयावर चर्चा करणेची मागणी केली. तथापी सदर वेळी मा.श्री.शं.ह.घुले यांनी सांगितले की, विषय क्र.४ ते ७ यापूर्वीच मंजूर केलेले आहेत. त्यामुळे विषय क्र.८ वर चर्चा करावी असे सांगितले. त्यामुळे सभागृहात पुन्हा गोंधळ झाला.

यानंतर मा.श्री.भानुदास कोतकर, नगरसेवक यांनी श्री.बनकर यांना विषय क्र.८ वाचणेबाबत सुचना केली. त्यानुसार विषय क्र.८ वाचून दाखविण्यात आला. मा.श्री.घुले यांनी या विषयाला मंजुरी देणेबाबत सुचविले.

मा.आयुक्त यांनी सांगितले की, शहराचा ८४ किलोमिटरचा एरिया असल्यामुळे नवीन विकासाची कामे करणे आवश्यक आहे. यावर मा.श्री.भानुदास कोतकर यांनी नवीन समाविष्ट १२ गावांच्या विकासाचा बॅकलॉग राहीलेला आहे, त्यामध्ये लाईट, रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज इ. करणे आवश्यक आहे, याबाबतचे नियोजन काय आहे असे विचारले. याबाबत सर्व्हे करणेचे आदेश दयावेत.

यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, याबाबत महापालिकेने लागणा-या स्टाफ कर्मचा-यांचा प्रस्ताव पूर्ण केलेला आहे. पुढील सर्व साधारण सभेपुढे हा प्रस्ताव येणार आहे. तसेच १२ गावांचा विकास आराखडा तयार करुन त्याकरिता येणारा एकूण खर्च व लागणा-या फंडाचा वापर योग्यरितीने करण्यासाठी कन्सलटंट नेमणे आवश्यक आहे व याबाबत पुनश्च सेप्रेट मिटींगपुढे विकास आराखडा ठेवण्यात येणार आहे.

१) मा.श्री.भगवान फुलसौंदर - प्रस्ताव चांगला आहे. त्यापुर्वी रस्ते चांगले करण्याचा प्रस्ताव दिला होता. याबाबत मनपाचे काय काय प्रस्ताव झाले आहेत, याची माहिती दयावी. सावेडी हद्द, १२ गांवे इ. याकरिता मनपाने नवीन ४ इंजिनिअर नेमलेले आहेत. आणखी इंजिनिअर नेमण्याची आवश्यकता आहे.

२) मा.श्री.आसाराम कावरे - इंजिनिअर टेंपररी नेमले जावू नयेत. यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, नवीन इंजिनिअर नेमण्याची कार्यवाही चालू आहे.

३) मा.श्री.दीप चव्हाण - विषय क्र.८ वर चर्चा चालु आहे. आतापर्यंत कोणकोणत्या कन्सलटींग एजन्सी नेमलेल्या आहेत व कोणकोणती कामे दिली आहेत. शासनाने विकास आराखडयाबाबत कोणी अधिकारी नेमले आहेत काय? श्री.निकम यांची टाउन प्लॅनर म्हणून नेमणूक झाली आहे असे वाटते. कोणकोणत्या कामासाठी कन्सलटंट नेमणार आहेत ते नमूद करावे.

४) मा.श्री.शंकरराव घुले - अशा प्रकारची एजन्सी पाणीपुरवठयाकरीता नेमली होती. ती दोन लाख रुपये घेउन गेली.

५) मा.श्री.अनंत जोशी - कालावधीचा उल्लेख केलेला नाही. विकास आराखडयाच्या संदर्भात कामे देण्यात आली आहेत, त्याचा खुलासा करावा. नागरिकांची येणारी पत्रे, यादी यांचा त्यात समावेश होईल काय. यावर मा.उपमहापौर यांनी खुलासा केला की, करारात उल्लेख होणार आहे. यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, कन्सलटंट पॅनलवर नेमणार आहेत. ५ ते १० लाख पासून रु.१ कोटीपर्यंतची कामे यासाठी पॅनलवर कन्सलटंट नेमण्यात येईल.

६) मा.श्री.कैलास गिरवले - मोठमोठया रस्त्यांचा अगोदर विचार करावा. पाईपलाईन रोड, बालिकाश्रम रोड, गुलमोहोर रोड इ.

७) मा.श्री.सुनिल त्रिपाठी - आमच्या भागातील रस्त्यांवर आतापर्यंत रु.१ ही खर्च झालेला नाही. कार्यवाही काहीच होत नाही. केदारवस्ती येथील पाणीपुरवठा दलितवस्ती येथील कामाबाबत कार्यवाही झाली पाहिजे. दलितवस्तीतील घरे आजही पाण्यात आहेत. त्यांच्या घराच्या भिंती पडणार आहेत. या भागाकडे गांभिर्याने पाहिले जात नाही. यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, या भागाचे एस्टीमेट तयार आहे. हायवे असल्यामुळे परमिशन मिळालेले नाही. यावर श्री.त्रिपाठी यांनी सांगितले की, याबाबत काहीच हालचाल केलेली नाही. दलित वस्तीकरिता शासन अनुदान देत आहे. परंतु मनपा याबाबत काहीच करीत नाही.

यानंतर मा.श्री.नामदेव पवार, मा.श्री.भानुदास कोतकर, मा.श्रीमती.वर्षा सय्यद यांनी चर्चेत भाग घेतला. मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, ज्या विभागातील घरे पडलेली आहेत किंवा पावसाच्या पाण्यामुळे हानी पोहोचली आहे अशा ठिकाणच्या संबंधीत इंजिनिअर यांना मदत करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत.

८) मा.श्री.अभय आगरकर - पुर्वानुभवानुसार एजन्सी नियुक्त कराव्यात व स्थानिक लोकांना त्यात सामावून घ्यावे.

विषय क्र.९ -

१) मा.श्री.कृ.द.जाधव - नियोजन समितीमध्ये मा.स्थायी समितीचे ३ सदस्यांची नियुक्ती करणेबाबतचे अधिकार मा.महापौर यांना देण्यात यावेत. त्यावर मा.श्री.कावरे यांनी त्यात सर्व पक्षाचे लोक घ्यावेत अशी सुचना केली.

२) मा.श्री.सुभाष लोंढे, सभापती, स्थायी समिती - गुप्त मतदान पध्दतीने निवडावेत. यावर मा.उपमहापौर श्री.सुळ यांनी महापौर ठरवतील असे सांगितले.

३) मा.श्री.अभय आगरकर - मतदान करता येईल.

४) मा.श्री.कृ.द.जाधव - स्पष्ट बहुमताने निर्णय झालेला आहे. महापौर यांना अधिकार दिले आहेत.

५) मा.श्री.भगवान फुलसौंदर - स्थायी समितीला अधिकार दयावेत.

यावर मा.श्री.श.ह.घुले बोलण्यासाठी उभे राहीले असता सभागृहामध्ये गोंधळ झाला.